# भारत-आसियान आर्थिक संबध

**प्रा. डॉ. राक्षसे सिद्धार्थ गुणाजी,** राज्यशास्त्र विभाग, गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज,कोल्हापूर.मोबा. 9921986598.

---

**प्रस्तावना**

1990 नंतर जागतिकीकरण आणि उदारिकरणाच्या प्रभावाने प्रादेशिक संघटनांचे युग अवतरले. भारतानेही या जागतिकीकरणाच्या प्रवाहात विविध धोरणांचा अवलंब केला. भारताला याचा फायदाही झाला. भारताला आसियान संघटनेच्या मित्रगटात प्रवेश मिळाला. 1996 ला भारत-आसियान प्रादेशिक मंचाचा सदस्य झाला. ऑक्टोबर 2003 च्या बाली संम्मेलनात भारताला आसियान सोबत करार करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

''भारत-आसियानमध्ये मुक्त व्यापार करार झाला आहे. त्यामूळे भारत आणि आसियानमधील व्यापारात वाढ होताना दिसते आहे. भारताचा 45% बाह्य व्यापार आसियान देशासोबत आहे. 1991 साली भारताचा आसियान सोबतचा व्यापार 3.1 अब्ज डॉलर होता. 2015 साली 76 अब्ज डॉलरवर पोहचला आहे.'' आसियान भारताचा चवथा आणि भारत-आसियानचा सहावा सर्वात मोठा व्यापारी भागीदार देश आहे. प्रस्तुत प्रकरणात भारत-आसियानमधील आर्थिक, व्यापारी संबंधांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**भारतीय अर्थव्यवस्था दृष्टिक्षेप**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील 70 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामूळे शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ 32,68,090 चौरस किलोमीटर असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगात सातवा क्रमांक लागतो. जगाच्या एकूण भूभागापैकी 2.4 टक्के भूभाग भारताने व्यापलेला आहे. भारतातील लघु व कुटीर उद्योग प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे.

''भारताची लोकसंख्या 1223 मिलियन इतकी आहे. जी.डी.पी.दर 4.0 टक्के इतका आहे तर नॉमिनल विकास दर 1.8 ट्रिलियन यु.एस. डॉलर आहे. पर व्यक्ती जी.डी.पी. 1492 यु.एस. डॉलर इतका आहे.''

**भारतातील कृषिक्षेत्र**

''भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषिक्षेत्राचा समावेश प्राथमिक क्षेत्रात करण्यात आला आहे. 2014-15 या सालात कृषिक्षेत्राचा GDP मधील हिस्सा 17.4 टक्के इतका होता. प्राचीन काळापासून कृषिक्षेत्राने भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका निभावली आहे. कृषि व संबंधित क्षेत्राचा 1951 मधील एकूण सकल उत्पादनातील हिस्सा 51.09 टक्के होता. 1960-61 मध्ये 46 टक्के झाला. त्यानंतर यात सातत्याने घसरण झालेली आहे. 2011-12 या सालात कृषी आणि संबंधित क्षेत्राचा हिस्सा 18.5 टक्के झाला. तसेच 2012-13 मध्ये 18.2 टक्के आणि 2013-14 मध्ये 18.3 टक्के इतका झाल. 2014-2015 या सालात पुन्हा त्यात घसरण होऊन 17.4 टक्के झाला. यात कृषिक्षेत्राचा 10.9 टक्के, वनिकी क्षेत्राचा 1.2 टक्के, पशुधनाचा हिस्सा 4.4 टक्के तर मत्स्य व्यवसाय क्षेत्राचा हिस्सा 1.2 टक्के एवढा होता.''

भारताचा कृषिक्षेत्रावरील रोजगार इ.स. 1951 साली 69.5 टक्के इतका होता तर 1991 मध्ये 64.9 टक्के झाला. सध्याचे हेच प्रमाण 52 टक्क्यावर आले आहे. यासाठी अविकसितपणा, वाढती लोकसंख्या, अपुऱ्या पायाभूत सुविधा, व्यवसायभिमूळ शिक्षणाचा अभाव इत्यादी घटक कारणीभूत आहेत.

''1990-91 पासून भारताच्या एकूण आयातीमध्ये कृषी व संलग्न वस्तूंच्या आयातीचे प्रमाण 2 ते 8 टक्क्याचया दरम्यान बदलत राहिले आहे. 1991-92 मध्ये हे प्रमाण 2.79 टक्के होते तर 2012-13 मध्ये हे प्रमाण 4.09 टक्के इतके होते.''

1990-91 मध्ये भारताच्या एकूण निर्यातीमध्ये कृषी संबंधित निर्यातीचे प्रमाण 10 ते 20 टक्क्यांच्या दरम्यान बदलत राहिले आहे. 1990-91 साली हे प्रमाण 18.49 टक्के होते. 2012-13 मध्ये हे प्रमाण 14.10 टक्के इतके होते.

भारत जगातील कृषी वस्तू निर्यात करणाऱ्या पहिल्या दहा देशात मोडतो. भारताचा कृषी निर्यात जागतिक व्यापारातील हिस्सा 1.7 टक्के होता तर जागतिक कृषी आयातीतील हिस्सा 1.2 टक्के इतका होता.

**उद्योग क्षेत्र**

कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मापन त्या देशाच्या झालेल्या औद्योगिक प्रगतीवरून करता येते. कारण औद्योगिक विकासावरच कृषिक्षेत्र आणि सेवा क्षेत्राचा विकास अवलंबून असतो. औद्योगिक प्रगतीमूळे रोजगारात वृद्धी होते. श्रमाच्या खरेदी शक्तीमध्ये वाढ होते. त्यामूळे औद्योगिक मागणीत वाढ होते. औद्योगिकीकरणामध्ये प्राथमिक उत्पादनास द्वितीय उत्पादनामध्ये परिवर्तीत केले जाते. ज्यामूळे उत्पादनात आत्मनिर्भरता येते. औद्योगिक क्षेत्रास द्वितीय क्षेत्र म्हणून ओळखले

जाते. द्वितीय क्षेत्रांतर्गत कारखानदारी / विनिर्माण बांधकाम, वीजनिर्मिती, पाणीपुरवठा इत्यादी व्यवसायाचा समावेश होतो. ''2013-14 मध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकासदर 5 टक्के होता. 2014-15 या सालात 5.9 टक्के इतका होता.'' जागतिक बँकेच्या अहवालानुसार 2015 मध्ये औद्योगिक उत्पादनात भारताचे स्थान 142 वे होते.

**सेवा क्षेत्र**

''अर्थव्यवस्थेतील प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्र यापैकी तृतीय क्षेत्र म्हणून सेवा क्षेत्र ओळखले जाते. सेवा क्षेत्र सर्वाधिक गतिशील क्षेत्राच्या स्वरूपात प्रगती करत आहे. सेवा क्षेत्राचे जागतिक स्थूल मूल्यवर्धीमध्ये जवळजवळ एक तृतीयांश, जागतिक रोजगारात 50 टक्के जागतिक व्यापारामध्ये 5 वा क्रमांक आणि जागतिक प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (FDI) मध्ये 50 टक्केपेक्षा अधिक योगदान राहिले आहे.''

सेवाच्या वर्गीकरणामध्ये विविध प्रकारच्या सेवांचा समावेश केला जातो. उदा. संगणक सॉफ्टवेअर, दूरसंचार, साठवण, व्यापार, वाहतूक, हॉटेल, रेस्टॉरंट, दळणवळण, विमा, वित्त, जहाजसेवा, विमानसेवा, गृहसेवा, रिअल इस्टेट, पायाभूत सोयी, आरोग्य शिक्षण इ. सेवा क्षेत्राच्या राष्ट्रीय लेखा वर्गीकरणामध्ये सामाजिक, सामुदायिक व खाजगी सेवा सहभागी केल्या जातात.

**भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती**

| | | 2000-01 | 2001-02 | 2002-03 | 2003-04 | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | 2007-08 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) | कृषी तसेच संबंधित सेवा | 0.02 | 6.3 | 7.2 | 10.2 | 0.0 | 5.9 | 3.8 | 2.6 |
| ब) | उद्योग | 6.4 | 2.7 | 7.1 | 7.4 | 9.8 | 9.6 | 10.0 | - |
| | खनन व उत्खनन | 2.4 | 1.8 | 8.8 | 3.1 | 7.5 | 5.7 | 5.7 | 3.4 |
| | विनिर्माण | 7.7 | 2.5 | 6.8 | 6.6 | 8.7 | 9.0 | 12.0 | 9.4 |
| | विद्युत, गैस | 2.1 | 1.7 | 4.7 | 4.8 | 7.5 | 4.7 | 6.0 | 7.8 |
| | जल्पपूर्ती निर्माण | 6.2 | 4.0 | 7.9 | 12.0 | 14.1 | 16.5 | 12.0 | 9.6 |
| क) | सेवा क्षेत्र | 5.7 | 7.2 | 7.4 | 8.5 | 9.6 | 9.8 | 11.2 | - |
| | व्यापारी, हॉटेल, परिवहन तसेचव संचार क्षेत्र | 7.3 | 9.1 | 9.2 | 12.1 | 10.9 | 9.4-14.6 | 8.5-16-6 | 12.1 |
| | वित्तीय, स्थावर संपदा तसेच व्यवसाय सेवा क्षेत्र | 4.1 | 7.3 | 8.0 | 5.6 | 8.7 | 11.4 | 13.9 | 11.7 |
| | समाज, सामाजिक तसेच वैयक्तिक सेवा क्षेत्र | 4.8 | 4.1 | 3.9 | 5.4 | 7.9 | 7.2 | 6.9 | 7.0 |
| ड) | सकल घरेलू उत्पादन | 4.4 | 5.8 | 3.8 | 8.5 | 7.5 | 9.4 | 9.6 | 8.7 |

इ.स. 1991-92 च्या दरम्यान आर्थिक विकासासाठी भारतीय अर्थव्यवस्थेत बदल करण्यात आले. त्यामूळे भारताची पूर्वीची आर्थिक अवस्था लुप्त झाल्याचे दिसून येते. 2006-07 या वर्षात भारताचा विकास दर 9.6 टक्के होता. तसेच 2005-06 साली 9.5 टक्के तर 2004-05 मध्ये 7.5 टक्के आणि 2003-04 साली 8.5 टक्के इतका होता. 2006-07 चा विकास दर यासाठी महत्त्वाचा होता की, कृषी व संबंधित क्षेत्रातील विकासदर 2.7 टक्के होता. 2005-06 मध्ये 6.0 टक्के होता. तर 2004-05 सालातील कृषिक्षेत्रातील दर शून्य टक्के असूनसुद्धा भारताच्या सकल घरेलू उत्पादनाची टक्केवारी 7.5 होती. सेवा क्षेत्रातील मोठा सहभाग त्यामूळे भारताला हा विकास दर बऱ्यापैकी स्थिर ठेवण्यात मदत झाली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. इ.स. 2002-03 तसेच 2006-07 या वर्षातील सकल घरेलू उत्पादनातील सेवा क्षेत्रातील योगदान 68.6 टक्के होते. त्यानंतर औद्योगिक क्षेत्राचा हिस्सा होता. त्यामूळे आपोआपच कृषिक्षेत्राचा हिस्सा कमी होऊन 2007-08 या वर्षात 17.5 टक्के तर उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा क्रम 26.5 टक्के आणि 56 टक्के इतका होता.

औद्योगिक क्षेत्राने वर्ष 2001-02 सालातील वार्षिक विकास दर 2.7 टक्के होता. 2002-03 तसेच 2003-04 सालातील क्रमशः हिस्सा 5.7 टक्के व 7.0 टक्के इतका होता. पुढील दोन वर्षात यात मोठी वाढ होऊन 8.4 टक्के तसेच 8.2 टक्के वाढ झाली आणि 2006-07 सालात 11.6 टक्क्यावर ही वाढ झाली.

सेवा क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. 1991-1992 ते 1999-2000 च्या दरम्यान 78.9 टक्के इतकी वाढ झाली आहे. तर 2000-01 ते 2006-07 च्या दरम्यान 88.7 टक्के वाढ झाली आहे.

त्याचबरोबर दळणवळण व दूरसंचार क्षेत्रात सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. 2002-07 या काळातील वृद्धीदर 15.3 टक्के इतका होता. माहिती तंत्रज्ञान सेवा, रेल्वे आणि सडक दळणवळण टेलिफोन इत्यादी सेवामूळे या क्षेत्रातील विकासदर वाढलेला आहे.

महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास जागतिक विकासाच्या प्रारुपानुसार ऐतिहासिक कालक्रमानुसार झालेला नाही. विकसित देशाच्या अनुभवानुसार आर्थिक विकासाचा क्रम पहिल्यांदा कृषिक्षेत्राचा असतो. त्यानंतर औद्योगिक क्षेत्र आणि त्यानंतर अंतिमरित्या सेवा क्षेत्र विकासपथावर येते; पण भारतीय अर्थव्यवस्था एकमात्र अशी जगातील अर्थव्यवस्था आहे. सकल घरेलू उत्पादनात औद्योगिक क्षेत्राची उल्लेखनीय वृद्धी न होताही सेवा क्षेत्राचे योगदान अर्धे-अधिक राहिले आहे. रोजगार क्षेत्राच्या वृद्धीवरूनही आपणांस लक्षात येते, गेल्या दोन दशकातील सेवा क्षेत्रातील रोजगार संधी वृद्धीदर उद्योग क्षेत्रापेक्षा जास्त आहे.

भारतातील संघटित क्षेत्रातील एकूण श्रम बळातील 8 टक्के रोजगार संधी आहे. राहिलेले 92 टक्के श्रम बल, कृषिक्षेत्र, सहाय्यक सेवा तसेच असंघटित क्षेत्रात कार्यरत आहे. असंघटित क्षेत्रामतील रोजगार स्थिती अत्यंत सोचनीय आहे. रोजगार अनिश्चिती, मजुरीचे दर कमी, तसेच कृषी व सहाय्यक सेवामध्येही मोठ्या प्रमाणात छुपी बेरोजगारी दिसून येते.

**विविध सेवांचा GDP तील वाटा व वृद्धीदर (2013-14)**

| **सेवा** | **हिस्सा (चालू मूळ किंमतीला %)** | | **वृद्धीदर (स्थिर किंमतीला)** | |
|---|---|---|---|---|
| | 2013-14 | 2014-15 | 2013-14 | 2014-15 |
| व्यापार, हॉटेल व रेस्टॉरंट | 12% | 11.8% | 13.3% | 10.7% |
| व्यापार व दुरूस्ती सेवा | 11% | 10.7% | 14% | 10.8% |
| हॉटेल व रेस्टॉरंट | 1.1% | 1.1% | 3.9% | 9.5% |
| वाहतूक साठवण व दळणवळण | 6.6% | 6.9% | 7.3% | 8.4% |
| रेल्वे | 0.8% | 9.3% | 0.8% | 7.7% |
| रस्ते वाहतूक | 3.2% | 3.2% | 5% | 6.3% |
| वायू वाहतूक | 0.1% | 0.2% | 6% | 12.8% |
| वित्तीय सेवा | 5.8% | 5.7% | 6.4% | 7.9% |
| रिअल इस्टेट व्यवसाय सेवा | 14% | 14.9% | 8.5% | 11.8% |
| लोकप्रशासन व संरक्षण | 6% | 6.2% | 4.9% | 9.8% |
| इतर | 6.9% | 7.2% | 10.7% | 11.4% |
| बांधकाम क्षेत्र | 8.3% | 8.8% | 2.5% | 4.4% |
| एकूण सेवा क्षेत्र (बांधकाम क्षेत्रासह) | 59.6% | 61.4% | 8.1% | 9.4% |

2014-15 मध्ये सेवा क्षेत्रामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत 10.3 टक्के वृद्धी राहिली आहे. ही वृद्धी प्रामुख्याने सेवांचे उपक्षेत्र जसे व्यापार, दुरुस्ती, हॉटेल आणि रेस्टॉरंट (10.7 टक्के), वित्तीय सेवा (7.9 टक्के), लोकप्रशासन आणि संरक्षण (9.8 टक्के) आणि इतर सेवा (11.4 टक्के) मध्ये वाढ झाल्याने होती.

**भारतातील प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक (FDI)**

परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक किंवा परकीय थेट गुंतवणूक (FDI) म्हणजे भारताबाहेर राहणाऱ्या अनिवासी संस्था किंवा अनिवासी व्यक्तींनी भारतीय कंपनीत केलेली थेट भांडवली गुंतवणूक म्हणजे परकीय थेट गुंतवणूक होय.

''भारतात 2000 ते 2015 या सालात झालेली प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक (FDI) पुढीलप्रमाणे झाली आहे.''

(मूल्य यु.एस.मिलियनमध्ये)

| **अ.क्र.** | **वर्ष** | **रक्कम** | **वृद्धीदर** |
|---|---|---|---|
| 1) | 2000-2001 | 2463 | - |
| 2) | 2001-2002 | 4065 | 65% |
| 3) | 2002-2003 | 2705 | -33% |
| 4) | 2003-2004 | 2188 | -19% |
| 5) | 2004-2005 | 3219 | +47% |
| 6) | 2005-2006 | 5540 | 72% |
| 7) | 2006-2007 | 12492 | +125% |
| 8) | 2007-2008 | 24575 | 97% |

| अ.क्र. | वर्ष | रक्कम | वृद्धीदर |
|---|---|---|---|
| 9) | 2008-2009 | 31396 | 28% |
| 10) | 2009-2010 | 25834 | -18% |
| 11) | 2010-2011 | 21383 | -17% |
| 12) | 2011-2012 | 35121 | 64% |
| 13) | 2012-2013 | 22423 | -36% |
| 14) | 2013-2014 | 24299 | 8% |
| 15) | 2014-2015 | 30931 | 27% |
| 16) | 2015-2016 | 29443 | - |
| | एकूण | 278077 | |

इ.स.2000 ते 2015 या सालातील एकूण परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (एफ.डी.आय.) 278076 यु.एस. मिलियन डॉलर इतकी आहे. 2000-2001 या साली परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक 2463 यु.एस.मिलियन होती. 2014-2015 या सालात 30931 यु.एस.मिलियन डॉलरची परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (एफ.डी.आय.) झाली. 2013-2014 च्या तुलनेत 27 टक्के वाढ झाली असल्याचे दिसून येते.

भारतात सर्वाधिक प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक (एफ.डी.आय.) करणारे देश10

2000 ते 2015 (एप्रिल - डिसेंबर)

| अ.क्र. | देश | एफ.डी.आय. रक्कम | हिस्सा |
|---|---|---|---|
| 1) | मौरितस | 93659.75 | 33.70 |
| 2) | सिंगापूर | 43172.31 | 15.53 |
| 3) | इंग्लंड | 22713.47 | 8.17 |
| 4) | जपान | 19434.28 | 6.99 |
| 5) | अमेरिका | 1726.45 | 6.21 |
| 6) | नेदरलँड | 16817.97 | 6.05 |
| 7) | सायप्रस | 8444.07 | 3.04 |
| 8) | जर्मनी | 8433.84 | 3.03 |
| 9) | फ्रान्स | 4880.47 | 1.76 |
| 10) | युएई | 3446.54 | 1.24 |
| | इतर देश | 278076 | - |

भारतात सर्वाधिक परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (एफ.डी.आय.) करणाऱ्या देशामध्ये मौरीतस या देशांचा पहिला क्रमांक आहे. तसेच सिंगापूर दुसऱ्या आणि इंग्लंड तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर दहाव्या क्रमांकावर युएईचा क्रम लागतो. मौरीतसची 33.70 टक्के गुंतवणूक आहे तर सिंगापूरचा हिस्सा 15.53 इतका आहे.

क्षेत्रानुसार प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक (एफ.डी.आय.) 2000 ते 2015

| अ.क्र. | क्षेत्र | एफ.डी.आय. रक्कम | हिस्सा |
|---|---|---|---|
| 1) | सेवा क्षेत्र | 48161 | 17% |
| 2) | बांधकाम विकास (टाऊनशिप, हौसिंग पायाभूत सुविधा) | 24180 | 9% |
| 3) | संगणक | 20419 | 7% |
| 4) | दूरसंचार | 18130 | 7% |
| 5) | ऑटोमोबाईल उद्योग | 14318 | 5% |
| 6) | औषधनिर्माण | 13447 | 5% |
| 7) | रसायने | 11628 | 4% |
| 8) | व्यापार | 10744 | 4% |
| 9) | ऊर्जा | 10258 | 4% |
| 10) | हॉटेल आणि पर्यटन | 8839 | 3% |

क्षेत्रानुसार परदेशी गुंतवणूक (एफ.डी.आय.) पाहता सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणता गुंतवणूक म्हणजे 17 टक्के इतकी आहे. त्यानंतर बांधकाम विकास 9 टक्के, संगणक 7 टक्के, ऑटोमोबाईल 5 टक्के, हॉटेल आणि पर्यटनावर 3 टक्के इतकी गुंतवणूक आहे.

आसियान देशांची भारतातील प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक (एफ.डी.आय.) 2000 ते 2015

| अ.क्र. | देश | एफ.डी.आय. रक्कम (यु.एस.मिलियन) | टक्के |
|---|---|---|---|
| 1) | सिंगापूर | 43172.31 | 15.53 |
| 2) | ब्रुनेई | 0.09 | 0.00 |
| 3) | कंबोडिया | - | - |
| 4) | लाओस | - | - |
| 5) | इंडोनेशिया | 624.28 | 0.22 |
| 6) | मलेशिया | 787.46 | 0.28 |
| 7) | म्यानमार | 8.96 | 0.00 |
| 8) | फिलिपाईन्स | 130.28 | 0.05 |
| 9) | थायलंड | 213.69 | 0.08 |
| 10) | व्हिएतनाम | 0.45 | 0.00 |
| | आसियान | 44940.33 | 17.33 |

आसियानची भारतातील परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक 44940.33 यु.एस. मिलियन डॉलर इतकी आहे. त्यामध्ये सिंगापूर 15.53 टक्के इतका हिस्सा आहे. त्यानंतर मलेशिया 0.98 इतका हिस्सा आहे. आसियानचा एकूण एफ.डी.आय. मधील गुंतवणूक 17.33 एवढी असल्याचे दिसून येते.

**भारताच्या परराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान**

एका वर्षात झालेल्या व पैशाच्या स्वरूपात मोजलेल्या परकीय व्यापाराला त्याचे आकारमान म्हणतात. त्यात आयातीचे आकारमान व निर्यातीचे आकारमान यांचा समावेश होतो. स्वातंत्र्यापूर्वी भारताची निर्यात नेहमी भारताच्या आयातीपेक्षा अधिक होती. म्हणजेच भारताचा व्यापारातील फायदा नेहमी अनुकूल असायचा. स्वातंत्र्यानंतर मात्र भारताची आयात निर्यातीपेक्षा वाढली त्याचा व्यापारावर प्रतिकूल परिणाम बनला. भारताच्या आयात निर्यातीच्या आकारमानातील बदल पुढील तक्त्यांच्या आधारावरून स्पष्ट होईल.

(यु.एस. अब्ज डॉलरमध्ये)

| वर्ष | आयात | निर्यात | व्यापार तोल |
|---|---|---|---|
| 1950-51 | 1.273 | 1.269 | -0.0004 |
| 1960-61 | 2.353 | 1.346 | -1.004 |
| 1970-71 | 2.162 | 2.03 | -0.131 |
| 1980-81 | 15.869 | 8.50 | -7.383 |
| 1990-91 | 24.075 | 18.14 | -5.932 |
| 2000-01 | 50.536 | 44.56 | -5.976 |
| 2011-12 | 369.769 | 251.163 | -118.633 |
| 2012-13 | 499.530 | 309.770 | -189.760 |
| 2013-14 | 502.240 | 306.580 | -195.660 |
| 2014-15 | 466.220 | 318.610 | -147.610 |

वरील अभ्यासावरून असे स्पष्ट दिसून येते की, स्वातंत्र्यानंतर भारताची आयात प्रचंड प्रमाणात वाढत गेली आहे. त्याचबरोबर निर्यात सुद्धा प्रचंड वाढत गेली आहे. काही अपवादात्मक वर्ष वगळता भारताची आयात ही निर्यातीपेक्षा जास्त झाली आहे. त्यामूळे भारताचा व्यापार तोल नेहमीच प्रतिकूल ठरलेला आहे. भारताची व्यापार तूट ही सतत वाढत गेली आहे. याचे कारण म्हणजे आयात वाढीचा दर हा निर्यात दरापेक्षा अधिक होता.

भारताने आयातीच्या 2011-12 मध्ये 400 अब्ज डॉलर्सचा टप्पा पार केला आहे. 2012-13 मध्ये 500 अब्ज डॉलर्सचा टप्पा पार केला. 2013-14 मध्ये मात्र आयात 500 अब्ज डॉलर्सपेक्षा कमी झाली आहे.

भारताने 2010-11 मध्ये निर्यातीचा 200 अब्ज डॉलर्सचा टप्पा पार केला तर 2011-12 मध्ये 300 अब्ज डॉलर्सचा टप्पा पार केला.

परकीय व्यापाराची संरचना आयातीची संरचना -

(एकूण आयातीपैकी हिस्सा)

| अ.नं. | आयात वस्तू गट | 2011-12 | 2012-13 | 2013-14 |
|---|---|---|---|---|
| 1) | अन्न व संबंधित वस्तू | 3.0 | 3.4 | 3.2 |
| | 1) कडधान्ये | 0.4 | 0.5 | 0.4 |
| | 2) काजू | 0.2 | 0.2 | 0.2 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 3) खाद्यतेल | 2.0 | 2.3 | 2.1 |
| 2) | इंधने | 35.3 | 36.9 | 40.4 |
| | 1) कोळसा | 3.6 | 3.5 | 3.6 |
| | 2) POL | 31.7 | 33.4 | 36.7 |
| 3) | खते | 2.3 | 1.8 | 1.4 |
| 4) | पेपर बोर्ड, न्युज प्रिंट इ. | 0.5 | 0.5 | 0.6 |
| 5) | भांडवली वस्तू | 13.3 | 12.8 | 11.9 |
| 6) | इतर वस्तू | 45.7 | 44.6 | 42.3 |
| | 1) रसायने | 4.9 | 5.0 | 5.7 |
| | 2) मोती मौल्यवान व अर्धमौल्यवान खडे | 5.7 | 4.6 | 5.3 |
| | 3) लोह व पोलाद | 2.5 | 2.2 | 1.8 |
| | 4) सोने व चांदी | 12.6 | 11.4 | 7.4 |
| | 5) इलेक्ट्रॉनिक वस्तू | 6.7 | 6.4 | 6.9 |
| | एकूण | 100.00 | 100.00 | 100.00 |

गेल्या काही वर्षातील आयातीची संरचना वरील तक्त्याच्या आधारे स्पष्ट होते. सध्या 40 देशाकडून भारत सुमारे 6000 वेगवेगळ्या वस्तूंची आयात करतो. वस्तू गटांच्या (Commodity Group) दृष्टीने पाहिल्यास गेल्या तीन वर्षात सर्वाधिक आयात इंधनाची केली आहे. 2013-14 मध्ये 40.4 टक्के इतकी आहे. त्या खालोखाल भांडवली वस्तूंची आहे. तसेच अन्न उत्पादन व खतांची केली आहे. वैयक्तिक वस्तूनुसार (Individual Items) पाहिल्यास 2013-14 मध्ये भारताने आयात केलेल्या पहिल्या वस्तूमध्ये पेट्रोलियम, ऑईल, ल्युब्रिकंटस् (POL) चे प्रमाण एकूण आयातीपैकी 36.7 टक्के, त्यानंतर सोने व चांदी 7.4 टक्के, इलेक्ट्रॉनिक वस्तू 6.9 टक्के, रसायने 5.7 टक्के आहे.

यामध्ये भांडवली वस्तूंची आयात वाढत गेल्याचे दिसते. कारण देशात वेगाने होणारे औद्योगिकीकरण त्याचबरोबर देशांतर्गत आधुनिक तंत्रज्ञान विकासात आलेले अपयश हे कारण आहे. त्याचबरोबर अन्नधान्याची व उपभोग्य वस्तूंची आयात कमी होत गेली आहे. खनिज तेल, धातू, मोती व मौल्यवान खडे, खते रसायने व औषधे इत्यादीची आयात मोठ्या प्रमाणात वाढत गेली आहे.

निर्यातीची संरचना -(एकूण निर्यातीपैकी हिस्सा)

| अ.न. | निर्यात वस्तू गट | 2011-12 | 2012-13 | 2013-14 |
|---|---|---|---|---|
| 1) | कृषि व संलग्न वस्तू | 12.3 | 13.7 | 13.8 |
| | 1) चहा | 0.3 | 0.3 | 0.3 |
| | 2) कॉफी | 0.3 | 0.3 | 0.3 |
| | 3) तृणधान्ये | 2.1 | 3.2 | 3.3 |
| | 4) फळे व भाज्या | 0.5 | 0.5 | 0.7 |
| | 5) सागरी उत्पादने | 1.1 | 1.2 | 1.6 |
| 2) | खनिजे व मूलद्रव्ये | 2.8 | 1.9 | 1.8 |
| 3) | उत्पादित वस्तू | 65.8 | 63.3 | 63.7 |
| | 1) कापड व तयार कपडे | 6.7 | 6.8 | 7.7 |
| | 2) खडे व दागिने | 14.7 | 14.4 | 13.1 |
| | 3) अभियांत्रिकी वस्तू | 16.4 | 16.2 | 17.2 |
| | 4) रसायने व संबंधित वस्तू | 5.6 | 6.3 | 6.3 |
| | 5) चामडे व चामडी वस्तू | 1.6 | 1.7 | 1.8 |
| | 6) हस्तकला वस्तू | 0.1 | 0.1 | 0.1 |
| 4) | अशुद्ध पेट्रोलियम व पेट्रोलियम पदार्थ | 18.6 | 20.7 | 20.7 |
| 5) | इतर बिगर वर्गीकृत वस्तू | 0.5 | 0.5 | 20.7 |
| | एकूण | 100.00 | 100.00 | 100.00 |

गेल्या काही वर्षातील निर्यातीची संरचना वरील तक्त्याच्या आधारे स्पष्ट होते. भारत 190 देशांना निर्यात करतो. वस्तू गटांच्या (Commodity Group) दृष्टीने पाहिल्यास भारताने 2013-14 मध्ये सर्वाधिक निर्यात उत्पादित वस्तूंची 63.7 टक्के इतकी केली होती. त्याच्या खालोखाल अशुद्ध पेट्रोलियम व पेट्रोलियम पदार्थ 20.7 टक्के तसेच कृषी व संलग्न वस्तूंची 13.8 टक्के निर्यात केली जाते. वैयक्तिक वस्तूंनुसार (Individual Items) पाहिल्यास 2013-14 मध्ये भारताने निर्यात केलेल्या वस्तूमध्ये अशुद्ध पेट्रोलियम व पेट्रोलियम पदार्थ 20.7 टक्के, अभियांत्रिकी वस्तू 17.2 टक्के, खडे व दागिने 13.1 टक्के, तयार कपडे 7.7 टक्के निर्यात केले.

2004-2005 पासून 2012-13 सालापर्यंत भारताची सर्वाधिक निर्यात अभियांत्रिकी वस्तूंची केली. 2013-14 मध्ये मात्र ह्यात बदल होऊन अशुद्ध पेट्रोलियम व पेट्रोलियम पदार्थांचा पहिला क्रमांक लागला आहे.

भारताच्या निर्यातीतील कृषी व खनिज संपत्तीचा वाटा कमी होत गेला तर उत्पादित वस्तूंचा वाटा वाढत गेला आहे. अनेक अपरंपरागत वस्तूंच्या निर्यातीचे महत्त्व वाढत आहे. उदा.अभियांत्रिकी वस्तू, हस्तकला वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, सॉफ्टवेअर व संबंधित सेवा इ. या वस्तू विकसित देशाकडूनही आयात केल्या जातात.

भारताच्या नवीन कृषी धोरणानुसार कृषी जन्य वस्तूंच्या निर्यातीला चालना मिळाली आहे. उदा. बासमती तांदूळ, फळे, फुले व भाज्या, हवाबंद अन्न इ.

याठिकाणी लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे पेट्रोलियमच्या पदार्थांची निर्यात वाढत आहे. 2015 साली ही निर्यात 56.7 बिलियन यु.एस. डॉलर एवढी होती. पेट्रोलियम पदार्थांच्या निर्यातीत ही वाढ भारतातील पेट्रोलियमच्या शुद्धीकरणाच्या क्षमतेच्या स्वयंपूर्णतेमूळे घडून येत आहे. भारत अशुद्ध पेट्रोलियमची आयात करतो. त्याच्या शुद्धीकरणातून निर्माण होणाऱ्या पदार्थांची देशी गरज भागल्यानंतर उर्वरित निर्यात केली जाते.

संदर्भ टिपा

1) ASEAN - India Free Trade Area Part I : ASEAN Briefing 2 Feb. 2013.
2) Hunt Luke - 'Indian Trade Seen Booming with ASEAN' - 26 August 2014.
3) Balance Sheet Statistics Times 2016.
4) Pocket Book or Agricultural Statistics - 2014. Govt. or India Ministry or Agriculture. Page No. 8
5) Industry Growth Rate in India GDP. http:businessmapsofindia.com
6) Services Sector Growth Rate in India GDP. http:businessmapsofindia.com
7) Pocket Book or Agricultural Statistics - Govt. or India Ministry or Agriculture.
8) Indian Economic Survey
9) Financial year wise FDI INFLOWS Data : Ministry of Commerce and Industry Govt. of India.
10) Ministry of Commerce and Industry Govt. of India. Statement on Country wise FDI Equity inflows from 2000 to 2015.
11) Sectorwise Highest FDI Equity inflows : Ministry of Commerce and industry. Govt. of India.
12) Ministry of commerce and industry Govt. of India.
13) Ministry of commerce and industry Govt. of India.
14) Annual Reports Ministry of Commerce and Industry Govt. of India.
15) Ibid.
16) Export - Import Data Ministry of commerce and industry Govt. of India. 2015
17) Ibid
18) Ministry of commerce and industry Govt. of India.
19) Ibid
20) ASEAN Summit : PM Narendra Modi's Look East Policy at Play. The Financial Express 12 Nov. 2014.
21) Export - Import Data Ministry of commerce and industry Govt. of India.
22) A Blue print for growth ASEAN Economic Community 2015 : Progress and Key Achievements Jakarta. Nov. 2015.
23) ASEAN Statistical year book - 2004. Page 43.
24) Morakot Tomtehargen - 'ASEAN Economic Community 2015' www.asiabiotech.com Page No. 37.
25) ASEAN Integration Report 2015. ASEAN Secretarial - Jakarta.